
# श्रीगणपत्यथर्वशीर्षम्




---

## ॐ नमस्ते गणपतये । त्वमेव ....आत्मासि नित्यम्

एकवीस देवगणांचा अधिपति असलेल्या गणपते तुला आमचा नमस्कार असो. तू प्रत्यक्ष परब्रह्म तत्त्वच आहेस. सर्व सृष्टीचा कर्ता केवळ तूच आहेस. सर्व सृष्टीचे धारण म्हणजे पालनपोषण तूच करतोस. आणि शेवटी समस्त सृष्टीचा हर्ता म्हणजे संहार करणाराही तूच आहेस. सर्वत्र व्यापून असणारे हे ब्रह्मतत्त्व म्हणजे तूच आहेस. तू म्हणजे साक्षात् चिरंतन असणारा आत्माच होय. ॥१॥

ऋतं वच्मि । सत्यं वच्मि ॥

हे माझे बोलणे ऋत म्हणजे पवित्र,कल्याणकारी आहे. ते सत्य म्हणजे खरेही आहे. ॥२॥

अव त्वं माम् ....पाहि समंतात् ॥

तू माझे रक्षण कर. तुझ्या विषयी यथार्थ बोलणाऱ्याचे तू रक्षण कर. असे यथार्थ बोलणे जो ऐकतो त्याचेही रक्षण कर. हे उपदेशरूपी दान यथावत् शब्दांच्या द्वारे जो दुसऱ्याला विधीपूर्वक देतो त्या दात्याचे रक्षण कर. हे उपदेशरूपी दान स्वीकारणाऱ्याचे म्हणजे तो उपदेश मननपूर्वक धारण करणाऱ्याचेही रक्षण कर.शिक्षा,कल्प,व्याकरण,निरुक्त,छंदःशास्त्र आणि ज्योतिष या सहा अंगांसह चारही वेदांचे गुरूपासून जो अध्ययन करतो त्याला अनूचान असे म्हणतात. वेदांचे सांग अध्ययन करणाऱ्या अशा अनूचाननामक स्नातकाचे तू रक्षण कर.तुझ्या चरणी शिष्य म्हणून विनम्र झालेल्या माझ्यासारख्याचे तू रक्षण कर. पश्चिम, पूर्व, उत्तर व दक्षिण या चारही दिशांकडून माझ्यावर येणाऱ्या संकटांपासून माझे रक्षण कर. वरून आणि खालूनही माझे रक्षण कर म्हणजे माझ्यावर कृपाछत्र धारण कर आणि मला तुझा भरभक्कम आधारही दे. सदा सर्वदा समंतात् म्हणजे सर्व बाजूंनी माझे सर्वतोपरी रक्षण कर. ॥३॥

त्वं वाङ्मयः । त्वं चिन्मयः ।....विज्ञानमयोऽसि ॥

वाणी हे तुझेच रूप आहे. तू चैतन्यरूप आहेस, आनंदरूप आहेस, ब्रह्मरूपही आहेस. आणि म्हणूनच सत्-चित्-आनंदात्मक अशा ब्रह्मतत्त्वाहून तू अद्वितीय आहेस म्हणजे वेगळा नाहीस. तू साक्षात् ब्रह्मच आहेस. मोक्षविषयक बोध म्हणजे ज्ञान आणि तदितर विषयांचा म्हणजे शास्त्रे, शिल्प,कला, इत्यादींचा

बोध म्हणजे विज्ञान. गणेशा ! ही ज्ञानविज्ञाने वस्तुतः तुझीच रूपे आहेत. ॥४॥

सर्वं जगदिदं त्वत्तो जायते। .... वाक्पदानि॥

हे सर्व जग तुझ्यापासूनच उत्पन्न झाले आहे.तू त्याच्या अंतर्यामी आधारभूत असल्यामुळेच ते विद्यमान आहे. शेवटी ते तुझ्यातच विलीन होत असते. अर्थात अखेरीस ते जग शेवटी तुझ्याकडेच परत येत असते. जगत् म्हणजे जाणारे-मुळापासून दूर जाणारे. पण शेवटी तेही फिरून तुझ्याकडेच म्हणजे मूळ पदावर येत असते; असा याचा भावार्थ. पृथ्वी, जल, अग्नी, वायू व आकाश ही पंच महाभूते तुझीच रूपे आहेत. म्हणजे या रूपांनी तूच विलसत असतोस. परा,पश्यन्ती,मध्यमा व वैखरी या सूक्ष्मातून स्थूलाकडे जाणाऱ्या वाणीच्या ज्या चार अवस्था आहेत त्या म्हणजे तुझीच चार रूपे होत. वाणीच्या या चारही अवस्थांमध्ये मूलतः, तत्त्वतः तूच विद्यमान असतोस. ॥५॥

त्वं गुणत्रयातीतः।....भुः भुवः स्वः ॐ ॥

तू सत्त्व,रजस् , आणि तमस् या तीनही गुणांच्या अतीत म्हणजे पलीकडे -निर्गुणआहेस; जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तीनही अवस्थांच्या पलीकडे म्हणजे तुर्या वा उन्मनी अवस्थेत तू राहतोस; तू स्थूल, सूक्ष्म आणि कारण या तीन देहांच्या पलीकडे असतोस-विदेही आहेस; भूत, वर्तमान व भविष्य या तीन कालांच्या पलीकडे म्हणजे नित्य असतोस; प्राणिमात्रांच्या नाभिस्थानी असलेल्या मूलाधार चक्राच्या ठिकाणी तुझे नित्य वास्तव्य असते; निर्मिती; निर्माण झालेल्यांची संस्थिती म्हणजे पोषण आणि कालांतराने त्याच उत्पन्न वस्तूंचा विनाश, या ज्या संसारातील समस्त घडामोडींना कारणभूत होणाऱ्या प्रमुख तीन शक्ती आहेत, त्याही वस्तुतः तुझीच रूपे आहेत. योगीजन नित्य तुझेच ध्यान करीत असतात. बह्मा तत्त्वतः तूच आहेस;विष्णू व रुद्रही मूलतः तूच आहेस. इंद्र, अग्नी, वायू, सूर्य,चंद्र या सर्व देवता म्हणजे तुझीच निरनिराळी रूपे आहेत. इतकेच नव्हे तर परब्रह्म ते तूच आहेस. पृथ्वी, अंतरिक्ष आणि स्वर्ग हे तीन लोक म्हणजे तुझीच रूपे आहेत. इतकेच काय, ॐ हे जे शब्दब्रह्म, तेही तुझेच एक रूप आहे. ॥६॥

गणादिं पूर्वं....गणपतये नमः॥

'गण' शब्दातील पहिला व्यंजनरूप जो 'ग्' त्याचा उच्चार प्रथम करून नंतर वर्णमालेतील आद्य स्वरूप वर्ण जो 'अ' त्याचा उच्चार करावा. अनुस्वाराचा उच्चार तदनंतर करावा. अर्थात् ग् + अ + ं =गं. तीन वर्णांचा हा क्रमानुवर्ती ध्वन्यात्मक उच्चार झाला. हे गणेशा, हेच तुझे मनुरूप म्हणजे मंत्रात्मक रूप आहे. मनु म्हणजे मंत्र. या मंत्रात्मक शब्दातील ग् + अ + ं या घटकांचा क्रमानुवर्ती पण सम्मीलित उच्चार करताना,विशेषतः 'ग् + अ' नंतर ं या अनुस्वाराचा उच्चार करताना ं याच्या आधी होणाऱ्या अर्धचंद्राकार स्वरलहरींच्या ऊर्ध्वगामी आंदोलनामुळे तो गं शब्द गँ अशा उल्लसित - तेजःपूर्ण रूपात उच्चारित होतो. अशाच अवस्थेत गँ या ध्वनीला मंत्रात्मकता येते. आणखी विशेष म्हणजे या गँ चा तारपूर्वक म्हणजे तारक असणारे जे ॐ हे परम अक्षर तत्पूर्वक म्हणजे ॐ गँ अशा रीतीने उच्चार केला म्हणजे या गँ मंत्रात सर्वतोपरीने ऋद्धता म्हणजे संपन्नता व सामर्थ्य प्राप्त होते. हे गणेशा, अशा प्रकारचा ॐ गँ हा जो

सम्मीलित ध्वनी म्हणजे उच्चारित शब्द ते तुझेच मंत्रात्मक वाङ्मयरूप होय. 'ग्' हे यामंत्राचे पूर्वरूप आहे तर 'अ' हे त्याचे मध्यमरूप आहे. 'अ' स्वराच्या नंतर आणि बिंदू म्हणजे नाकातून उच्चारित होणाऱ्या ध्वनीच्या पूर्वी उच्चारला जाणारा अर्धचंद्राकार ध्वनि ॅ म्हणजे अनुस्वार हे त्याचे अंत्य रूप आहे. . हा अनुनासिक ध्वनि हे या मंत्राचे उत्तर रूप आहे. गँ मंत्राच्या या चार ध्वनीघटकांचा क्रमानुवर्ती उच्चार होत असताना त्या सर्वांच्याशी अनुसंधान ठेवणारा जो एक विशिष्ट नाद म्हणजे विशिष्ट ध्वनी उत्पन्न होतो, तो या मंत्राचे संधान म्हणजे समुचित अधिष्ठान होय. त्याच अधिष्ठानावर मंत्रातील चारही घटक एकमेकांशी समरस वा समन्वित होत असतात. यापुढची अपरिहार्य अवस्था म्हणजेच या घटकांची संहिता. चारही घटक एकजीव,समरस झाल्याप्रमाणे एकाच स्वराच्या आधारे एकमेकांशी समरस होऊन जाणें, एकाही घटकाची जाणीव पृथक्तया किंवा फुटीरपणाने न होता, सर्वांची मिळून एकच समरस व सुसंवादी जाणीव होणे, या निरतिशय सान्निध्याचे नाव संहिता. ही संहिता हाच या मंत्राचा संधी म्हणजे परम अधिष्ठान. हा संधी म्हणजे हे अधिष्ठानही ध्वनीरूपच असते. मंत्राची परिणामकारकता याच अवस्थेत उत्कटतेने प्रत्ययास येते. गणेशविद्या ती हीच. विद्या म्हणजे मंत्र. ॐ गँ ही विद्या म्हणजे हा मंत्र गणेशदेवतची प्राप्ती करून देतो. या मंत्राचा ऋषी गणक आणि छंद निचृत् गायत्री. गणक नावाच्या ऋषीला तपस्येतून त्याचे दर्शन झाले. निचृत् गायत्री या छंदातून त्याचे स्फुरण झाले. गणपती ही या मंत्राची देवता. या देवतेची प्राप्ती व्हावी, हे या मंत्राच्या जपाचे प्रयोजन. ॐ गँ या मंत्राच्या जपोच्चाराने त्या गणपतीला आमचा प्रणाम असो. ॥७॥

एकदंताय विद्महे । वक्रतुंडाय धीमहि ।तत् नः दंती प्रचोदयात्

त्या एकदंताला आम्ही जाणून घेऊ इच्छितो. त्या वक्रतुंडाचेही आम्ही ध्यान करू इच्छितो. म्हणून त्या दंतधारी गजाननानेच त्यासाठी आम्हाला समुचित प्रेरणा द्यावी. ॥८॥

एकदंतं चतुर्हस्तं ….स योगी योगिनां वरः॥

ज्याला एकच मोठा दात म्हणजे सुळा आहे, ज्याला हात चार आहेत, त्यापैकी तीन हातांत अनुक्रमे नागपाश, अंकुश आणि गजासुराचा तुटका दात, आयुधे म्हणून त्याने धारण केली आहेत, आणि चौथा हात भक्तांना वर देण्यासाठी विशिष्ट स्थितीत ज्याने उंचावलेला आहे , उंदीर हे ज्याच्या आगमनाचे सूचकचिन्ह किंवा वाहन आहे, ज्याचा देह रक्तवर्णी आहे, ज्याचे उदर विशाल आहे, ज्याचे कान सुपासारखे म्हणजे इतरांचे दोष टाकून फक्त गुणांचेच ग्रहण करणारे आहेत, ज्याने रक्तवर्णी वस्त्र परिधान केले आहे , ज्याच्या अंगप्रत्यंगांना रक्तगंधाची उटी चर्चिली आहे , रक्तवर्णी फुलांनीच ज्याची पूजा बांधिली जात असते, आपल्या भक्तांवर जो नित्य कृपेचा वर्षाव करीत असतो, तत्त्वतः अच्युत म्हणजे अविकारी असूनही जो देव जगाच्या निर्मितीला कारणीभूत होतो व म्हणूनच सकल सृष्टीच्याही आधी जो आविर्भूत झालेला असतो आणि म्हणूनच क्षेत्रस्वरूप प्रकृतीच्या व बीजस्वरूप पुरुषाच्याही तो पलीकडचा म्हणजे आधीचा असतो. एवंगुणविशिष्ट अशा या गणेशदेवाचे, जो योगी, उपरनिर्दिष्ट रूपांत नित्य ध्यान करतो, तो खरोखरच योगिवर्यच होय. ॥९॥

नमो व्रातपतये .... श्रीवरदमूर्तये नमः

व्रात म्हणजे समूहजीवी कष्टकरी जन. त्यांचा पती म्हणजे पालक, तसेच प्रमथ म्हणजे पिशाच योनीत वावरणाऱ्या प्राण्यांचा पती म्हणजे शासक असा जो गणपती त्याला आमचा नमस्कार असो. त्या लंबोदर, एकदंत,विघ्नहर्त्या शिवपुत्र गणेशाला आमचा नमस्कार असो. श्री म्हणजे सर्व प्रकारचे ऐश्वर्य वरस्वरूपात प्रदान करणारा मूर्तिमंत वरदाता जो गणेश त्याला आमचा नमस्कार असो. ॥१०॥

एतद् अथर्वशीर्षं यः अधिते। तं तं अनेन साधयेत् ॥

हे अथर्वशीर्ष जो पठण करतो तो ब्रह्मस्वरूपी विलीन होतो; कोणत्याच प्रकारची विघ्ने त्याला बाधक होत नाहीत; सर्वतोपरीने त्याला सुखाचीच प्राप्ती होते; ब्रह्महत्या, सुरापान,चोरी करणे, गुरुपत्नीशी व्यभिचार ही स्वतःकडून होणारी चार आणि ती करणाऱ्या व्यक्तीशी संगत करणे हे पाचवे, ही जी पंचमहापातके त्यांच्यापासूनही अथर्वशीर्षाचे पठण करणारा मुक्त होतो. हे अथर्वशीर्ष जो सायंकाळी पठण करतो तो दिवसभर केलेल्या पापापासून मुक्त होतो. प्रातःकाळी पठण करणाऱ्याची रात्री केलेली पापे नष्ट होतात. सकाळ सायंकाळ दोनही वेळ पठण करणारा पूर्णतया पापरहित होतो. सदा सर्वदा पठण करणाराची सर्व विघ्ने कायमची दूर होतात. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चारही पुरुषार्थांची त्याला प्राप्ती होते. हे अथर्वशीर्ष शिष्य नसलेल्या व्यक्तीला देऊ नये म्हणजे सांगू नये. क्वचित् मोहाला बळी पडून जो तसे करतो, त्याला पाप भोगावे लागते. या अथर्वशीर्षाची हजार आवर्तने केली तर ती करणारा जी जी कामना करतो ती ती पूर्ण होते. सहस्त्रावर्तनाने कोणतेही इप्सित साध्य होते. ॥११॥

अनेन गणपतिं अभिषिंचति ।....कदाचन इति ॥

या अथर्वशीर्षाचा उच्चारपूर्वक गणपतीवर जो अभिषेक करतो तो वाग्मी म्हणजे कुशल वक्ता होतो. चतुर्थीला अनश्नन् म्हणजे निराहार राहून याचा जो जपकरतो तो विद्यासंपन्न होतो. हे अथर्वण ऋषीचे वाक्य म्हणजे उच्चारण आहे. ते अथर्वशीर्ष ब्रह्मतत्त्वाचे आदि म्हणजे श्रेष्ठ आवरण म्हणजे संरक्षक कवचच होय.ते धारण करणाराकडे कोठूनही आणि कधीही भय फिरकत नाही. ॥१२॥

यो दूर्वांकूरैः यजति।....स सर्वं लभते॥

या अथर्वशीर्षाचे पठण करून जो दूर्वांकुरांचे हवन करतो तो विश्रव्याचा पुत्र वैश्रवण म्हणजे कुबेर, त्याच्यासारखा अमाप धनाने संपन्न होतो या अथर्वशीर्षाचे पठण करून जो धानाच्या लाह्यांचे हवन करतो, तो सर्वत्र यशस्वी होतो, तसेच मेधावान् म्हणजे पवित्र, शुद्ध प्रज्ञेने संपन्न होतो. या अथर्वशीर्षाचा जप करीत जो हजार मोदकांचे हवन करतो त्याला त्याचे इप्सित फळ प्राप्त होते, तसेच तूप चोपडलेल्या समिधांचे जपपुरस्सर हवन केले तर हवन करणाऱ्याला सर्व काही प्राप्त होते, सर्व मिळते. ॥१३॥

अष्टौ ब्राह्मणान् सम्यक ग्राहयित्वा।..... इति उपनिषद्॥

आठ सत्पात्र ब्राह्मणांकडून या अथर्वशीर्षाचे विधिवत् ग्रहण करविले म्हणजे त्यांना शिष्यत्व देऊन यथाविधी त्याची दीक्षा दिली तर तसे करणारा सूर्याप्रमाणे वर्चस्वी म्हणजे तेजस्वी होतो. सूर्यग्रहणकाळात

गंगादि महानद्यांपैकी एखाद्या महानदीच्या पात्रात उभे राहून किंवा गणपतीच्या प्रतिमेच्या - मूर्तीच्या सान्निध्यात या अथर्वशीर्षाचा जप केल्यास 'ॐ गँ' हा मंत्र सिद्ध होतो. शिवाय मोठमोठ्या संकटांपासून सुटका होते, मोठमोठे दोष दूर होतात, मोठमोठ्या पापांपासूनही मुक्ती मिळते. इतकेच नव्हे तर ती व्यक्ती सर्वज्ञ होते. सकलज्ञानसंपन्न होते. याप्रमाणे जो हे जाणतो, त्याच्यासाठी हे उपनिषद् म्हणजे गुरूजवळ बसून शिकण्याची रहस्यात्मक ज्ञानाची उपासना वा साधना आहे. ॥१४॥

ॐ सह नौ अवतु। सह नौ भुनक्तु। सह वीर्यं करवावहै। तेजस्वि नौ अधीतं अस्तु। मा विद्विषावहै । ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

हे अध्ययन आम्हा दोघा गुरुशिष्यांचे बरोबरच अवन म्हणजे रक्षण करो. दोघांच्या बरोबरच उपयोगी पडो; त्यामुळे आम्ही दोघेही सारखेच वीर्य म्हणजे पराक्रम करण्यास समर्थ होऊ; आम्हा दोघांचेही हे अध्ययन सारखेच तेजस्वी होवो; आम्हा दोघांही कडून कधीही कुणाचाही विद्वेष म्हणजे मत्सर न होवो. सर्वत्र सर्वांची शांती म्हणजे कल्याण होवो. ॥१५॥

मूळ संस्कृत

ॐ भद्रं कर्णेभिः श्रुणुयाम देवाः
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः।
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिः
व्यशेम देवहितं यदायुः ॥

मराठी अनुवादः

कल्याण नित्य अमुच्या श्रवणीं पडावे
कल्याण नित्य अमुच्या नयनां दिसावे ।
कल्याण नित्य अमुच्या करवी घडावे
आयुष्य देवयजनात असेच जावे ॥

***

**मराठी अनुवाद आणि विवेचन: वैद्य श्री. पु. हिर्लेकर**

http://www.shriniwas-hirlekar.com Copy Rights: Vinata Kulkarni

***

## *(Ganapati-AtharvaShirsha)*
## *Original Sanskrit text*

The Highest Praise of the Lord Ganesh

Ganapathi Atharva Seersha is a part of Atharva Veda. It is classified as an Upanishad and not as a chant; yet it is still considered universally as the greatest and most effective prayer addressed to Ganesh.

॥ श्रीगणेशाय नमः ॥
शान्ति मन्त्रः॥
ॐ भद्रं कर्णेभिः श्रृणुयाम देवा ।
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिः ।
व्यशेम देवहितं यदायुः ।
ॐ स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः ।

स्वस्ति नः पुषा विश्वैवेदाः ।
स्वस्ति नस्ताक्ष्र्यो अरिष्टनेमिः ।
स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ।

## ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

## अथर्वशीर्ष

## ॐ नमस्ते गणपतये ।

त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि ।
त्वमेव केवलं कर्तासि ।
त्वमेव केवलं धर्तासि ।

## त्वमेव केवलं हर्तासि ।

त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि ।

## त्वं साक्षादात्मासि नित्यम् ॥१॥

ऋतं वच्मि ।

## सत्यं वच्मि ॥२॥

अव त्वं माम् ।
अव वक्तारम् ।
अव श्रोतारम् ।
अव दातारम् ।
अव धातारम् ।
अवानूचानमवशिष्यम् ।
अव पश्चातात् ।
अव पुरस्तात् ।
अवोत्तरातात् ।
अव दक्षिणातात् ।
अव चोर्ध्वातात् ।
अवाधरातात् ।

## सर्वतो मां पाहि पाहि समन्तात् ॥३॥

त्वं वाङ्मयस्त्वं चिन्मयः ।
त्वमानन्दमयस्त्वं ब्रह्ममयः ।
त्वं सच्चिदानन्दाद्वितीयोऽसि ।
त्वं प्रत्यक्षं ब्रह्मासि ।

## त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि ॥४॥

सर्वं जगदिदं त्वत्तो जायते ।
सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठति ॥
सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति ।
सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति ।
त्वं भूमिरापोऽनलोऽनिलो नभः ।

## त्वं चत्वारि वाक्पदानि ॥५॥

त्वं गुणत्रयातीतः ।
त्वं देहत्रयातीतः ।
त्वं कालत्रयातीतः ।
त्वं मूलाधारस्थितोऽसि नित्यम् ।
त्वं शक्तित्रयात्मकः ।
त्वां योगिनो ध्यायन्ति नित्यम् ।
त्वं ब्रह्मा त्वं विष्णुस्त्वंरुद्रस्त्वमिन्द्रस्त्वमग्निस्त्वं

## वायुस्त्वं सूर्यस्त्वं चन्द्रमास्त्वं ब्रह्मभूर्भुवःस्वरोम् ॥६॥

गणादिं पूर्वमुच्चार्य वर्णादिं तदनन्तरम् ।
अनुस्वारः परतरः ।
अर्धेन्दुलसितम् ।
तारेण ऋद्धम् ।
एतत्तव मनुस्वरूपम् ।
गकारः पूर्वरूपम् ।
अकारो मध्यमरूपम् ।
अनुस्वारःश्चान्त्यरूपम् ।
बिन्दुरूत्तररूपम् ।
नादः सन्धानम् ।
संहितासन्धिः ।
सैषागणेशविद्या ।
गणकऋषिः ।
निचृद्गायत्री छन्दः ।
गणपतिर्देवता ।

**ॐ गं गणपतये नमः ॥७॥**

एकदन्ताय विद्महे ।
वक्रतुण्डाय धीमहि ।

**तन्नो दन्ती प्रचोदयात् ॥८॥**

एकदन्तंचतुर्हस्तंपाशमङ्कुशधारिणम् ।
रदं च वरदं हस्तैर्बिभ्राणं मूषकध्वजम् ।
रक्तं लंबोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससम् ।
रक्तगन्धानुलिप्ताङ्गं रक्तपुष्पैः सुपूजितम् ।
भक्तानुकंपिनं देवं जगत्कारणमच्युतम् ।
आविर्भूतं च सृष्ट्यादौ प्रकृतेः पुरुषात् परम् ।

**एवं ध्यायति यो नित्यं स योगी योगिनां वरः ॥९॥**

ॐ नमो वातप्रतये ।
नमो गणपतये ।
नमः प्रमथपतये ।
नमस्ते अस्तु लम्बोदरायैकदन्ताय विघ्ननाशिने

**शिवसुताय श्रीवरदमूर्तये नमः ॥१०॥**

## फलश्रुती

**एतदथर्वशीर्षं योऽधीते स ब्रह्मभूयाय कल्पते ।**

**स सर्वविघ्नैर्न बाध्यते ।**

**स सर्वतः सुखमेधते ।**

स पंचमहापापात् प्रमुच्यते ।
सायमधीयानो दिवसकृतं पापं नाशयति ।
प्रातरधीयानो रात्रिकृतं पापं नाशयति ।
सायंप्रातः प्रयुंजानो अपापो भवति ।
सर्वत्राधीयानोऽपविघ्नोभवति ।
धर्मार्थकाममोक्षं च विन्दति ।
इदमथर्वशीर्षमशिष्याय न देयम् ।
यो यदि मोहाद् दास्यति स पापीयान् भवति ।
सहस्त्रावर्तनात् ।

**यं यं काममधीते तं तमनेन साधयेत् ॥११॥**

अनेन गणपतिमभिषिञ्चति ।
स वाग्मी भवति ।
चतुर्थ्यामनश्नन्जपति ।

स विद्यावान भवति ।
इत्यथर्वणवाक्यम् ।
ब्रह्माद्यचरणं विद्यात् ।

## न बिभेति कदाचनेति ॥१२॥

यो दूर्वाङ्कुरैर्यजति ।
स वैश्रवणोपमो भवति ।
यो लाजैर्यजति ।
स यशोवान् भवति ।
स मेधावान् भवति ।
यो मोदकसहस्त्रेण यजति ।
स वांछितफलमवाप्नोति ।
यः साज्यसमिद्भिर्यजति ।

## स सर्वं लभते स सर्वं लभते ॥१३॥

अष्टौ ब्राह्मणान् सम्यग् ग्राहयित्वा सूर्यवर्चस्वी भवति ।
सूर्यग्रहे महानद्यां प्रतिमासंनिधौ वा जपत्वा ।
सिद्धमन्त्रो भवति ।
महाविघ्नात् प्रमुच्यते ।
महापापात् प्रमुच्यते ।
महादोषात प्रमुच्यते ।
स सर्वविद् भवति स सर्वविद् भवति ।
य एवं वेद ।

## इत्युपनिषत् ॥१४॥

ॐ सह नाववतु ।
सह नौ भुनक्तु ।
सह वीर्यं करवावहै ।
तेजस्विनावधीतमस्तु ।
मा विद्विषावहै ॥

## ॥ ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

*इति श्रीगणपत्यथर्वशीर्षोपनिषद्*

***

http://www.shriniwas-hirlekar.com